Annexure –VIII

**UNIVERSITY GRANTS COMMISSION**

**BAHADUR SHAH ZAFAR MARG**

**NEW DELHI – 110 002**

## PROFORMA FOR SUBMISSION OF INFORMATION AT THE TIME OF SENDING THE FINAL REPORT OF THE WORK DONE ON THE PROJECT

1. **NAME AND ADDRESS OF THE PRINCIPAL INVESTIGATOR** :-AMBADAS ONKAR BAKRE
2. **NAME AND ADDRESS OF THE INSTITUTION** :- NATWARLAL MANIKLAL DALAL COLLEGE OF ARTS AND COMMERCE, GONDIA -441614 (M.S.)
3. **UGC APPROVAL NO. AND DATE** :- 23-2727/2011/(WRO) DATED 12TH JANUARY 2012
4. **DATE OF IMPLEMENTATION** :- 12TH JANUARY 2012
5. **TENURE OF THE PROJECT** :- 02 YEARS
6. **TOTAL GRANT ALLOCATED** :- 50000/-
7. **TOTAL GRANT RECEIVED** :- 35000/-
8. **FINAL EXPENDITURE** :-
9. **TITLE OF THE PROJECT** :- आधुनिक महाराष्ट्रातील स्त्रीविषयक सुधारणांसंदर्भात धार्मिक सुधारणांचे महत्व (1818–1960)
10. **OBJECTIVES OF THE PROJECT:-**
    1. महाराष्ट्रातील सुधारणावादाचे स्वरूप आणि चरित्र अभ्यासणे
    2. सुधारणा आंदोलन आणि राष्ट्रीय आंदोलन यांच्यातील आंतरसंबंध तपासणे.
    3. स्त्रीविषयक सुधारणाबाबतच्या विवादाचे अध्ययन करणे.
    4. धार्मिक सुधारणांमुळे झालेले सामाजिक बदल आणि त्यांचा महाराष्ट्रातील समाज जीवनावर पडलेला प्रभाव यांचा अभ्यास करणे

http://nmdcgondia.org/mrpfile/Ambadas_Bakre.pdf

11. **WHETHER OBJECTIVES WERE ACHIEVED (GIVE DETAILS) :-**

19 व्या शतकातील महाराष्ट्रीय समाज जीवनाचे स्वरूप पारंपारिक होते. हया परंपरावादी समाजजीवनावर ज्ञानाधिष्ठित समूहाकडून आघात होऊ लागल्याने पहिल्या पिढीतील ऐत्तदेशीय बुध्दीजीवी वर्ग हिंदू समाजाच्या अवनतीची कारण मिमांसा करू लागले. हया चिंतनातून त्यांना हे दिसून आले की, हिंदू धर्मशास्त्राचा पगडा समाजजीवनावर पडल्यामुळे अनावश्यक रूढी, प्रथा, परंपराचे प्रचलन अव्याहतपणे समाजात सुरू आहे. हया अनावश्यक परंपराचा सर्वाधिक बळी स्त्री ठरली आहे. हजारो वर्षापासून ज्ञानाच्या क्षेत्रात केवळ ब्राम्हण वर्गाची मक्तेदारी राहिल्याने धर्मविचारांचे तत्वचिंतन व्यवहारशील रूपात होऊ शकले नाही. समाज हया धर्मशास्त्र नियमांनाच जीवनाच्या सार्थकाचे परिणाम लावू लागला. बुध्दीजीवी वर्गाच्या मते, हिंदू समाजाच्या अवनतीचे मुळ हया प्रक्रीयेत होते. म्हणून त्यांनी धर्मशास्त्राच्या अनावश्यक संरचनावर आघात करण्यास सुरवात केली. सुधारणा चळवळीच्या उदयाचा हा प्रारंभ होता.

महाराष्ट्रातील सुधारणा चळवळीच्या वाटचालीस विविधांगी आयाम राहिले. एकीकडे ही चळवळ शास्त्रार्थाचा आधार घेते तर दुसरीकडे सुधारणेच्या अनुषंगाने बुध्दीवादाचे समर्थन करते. याशिवाय पाश्चात्य ज्ञानाधिष्ठित समाजाच्या आदर्श डोळयासमोर ठेवून परिवर्तनाच्या विचारांची पेरणी समाजात करतांना दिसते. एकंदरीत शास्त्रप्रामाण्यवादाच्या विरोधात शास्त्रार्थाचे आधुनिक प्रयोजन लक्षात घेऊन परंपरावर आघात करण्यालाही शास्त्रार्थाचा केलेला वापर, धर्मविचारांच्या पाठीमागे लपलेल्या मोक्षवादाच्या संकल्पनेचे उदारमतदवादी दृष्टीने केलेले निरूपण, परंपरांना नाकारून नवक्रांतीच्या उद्देशाने आलेली अनार्थ धर्मचिकित्सा व समतावादी विचारांचा केला गेलेला पुरस्कार, नितांत बुध्दीवादाचे समर्थन करून सामाजिक उध्दारासाठी स्विकारलेला सुधारणावाद, पर्यायी धर्माची कल्पना, सांस्कृतिक भिन्नतेची मांडणी, हे 19 व्या शतकातील सुधारणावादाचे मुलभुत स्वरूप राहिले. ज्याव्दारे स्त्रीविषयक प्रश्नांची सोडवणूक करण्याचा सुधारकांनी प्रयत्न केला.

‘‘हजारो वर्षाच्या कालखंडात प्रथमच हिंदू धर्माच्या उपयोगितेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी संरचना उभी झाली. परंपरांना नाकारण्याची, नवसिध्दांताची मांडणी करण्याची दृष्टी विकसीत झाली. परंपरेतून समतेचा अविष्कार पुढे आणून त्या आधारावर आधुनिक समाजाची निर्मीती करण्याचे प्रयत्न या कालखंडात सुरू झाले. आधुनिक भारताच्या उभारणीचा हा प्रारंभ होता. जो नवविचारांतून आला होता. महाराष्ट्रातील सुधारणा चळवळीचे यापेक्षा अधिक सटिक वर्णन होऊ शकत नाही’’ .

धर्मसुधारणा चळवळीचे प्रत्यक्ष परिणाम 19 व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि 20 व्या शतकात जाणवू लागतात. स्त्री शिक्षणाच्या चळवळीने अल्पावधीत महाराष्ट्रीय समाज जीवनावर छाप पाडली. सर्वांत महत्वाचे वैशिष्ठय म्हणजे भारतात पहिल्या प्रथम स्त्री शिक्षणाचा विकास समाजाच्या सर्व स्तरांत होऊ लागला. एकीकडे उच्च वर्णीय स्त्री शिक्षण घेण्यास

घराबाहेर पडू लागली. तेवढीच दुसरीकडे शुद्र व अस्पृश्य वर्गातील स्त्री वर्ग ही शिक्षणात सहभागी होऊ लागला प्रगती करू लागला. या चळवळीचे सर्वांत मोठे योगदान स्त्री वर्गात आत्मभान निर्माण करण्याच्या संबंधाने आहे. मुक्ताचा निबंध, ताराबाई शिंदे लिखीत स्त्री पुरूष तुलना, पंडिता रमाबाईचे स्त्री धर्मनिती हे साहित्य स्त्री जीवनाविषयी स्त्रीच्या मतात असलेल्या भावनांना व्यक्त करते. पुरूषाव्दारे होणा–या शोषणाचे आकृतीबंध व्यक्त करते. जातिव्यवस्थेच्या संरचनाना नाकारते. याशिवाय स्त्री उन्नतीसाठी शिक्षणाचा पुरस्कार करून स्त्री दास्यांच्या जोखडावर हल्ले करते. बालविवाह, विधवापन, सती, केशवपन सारख्या रूढींना नाकारते. स्त्री हक्कांची भाषा करते. 19 व्या शतकातील चळवळीचे वेगळेपण दिसुन येते. जे फक्त महाराष्ट्रात घडून आले.

स्त्रीविषयक सुधारणा चळवळीचा सर्वाधिक परिणामकारक प्रभाव 20 व्या शतकात व्यक्त झाला. स्त्रीविषयक सुधारणेच्या क्षेत्रात आता स्वतः स्त्री वर्ग उतरू लागला. स्त्री प्रश्नांची सार्वजनिक चर्चा करू लागला. सेवासदन, वनिताश्रम, बालिकाश्रम , अनाथ बालिकाश्रम ही चर्चाची व्यासपीठे बनली. स्त्रीदास्याबरोबरच स्त्री हक्काची मागणी स्त्री वर्गाने करण्यास सुरवात केली. हे हक्क राजकीय, आर्थिक स्वरूपाचे होते. 1921 मध्ये भारतीय स्त्रीला मतदानाचा मिळालेला अधिकार हे स्त्री चळवळीचे मोठे यश होते. कारण असा हक्क जगात पहिल्यांदा भारतीय स्त्रीला मिळाला होता. आर्थिक स्वावलंबनाच्या क्षेत्रात स्त्री वर्ग संघटित रूपात उतरू लागला. अर्थात आर्थिक स्वावलंबनाची दृष्टी कौटुंबिक होती. परंतू अतिशय महत्व होते. हजारो वर्षे जो अधिकार स्त्रीला नाकारण्यात आला होता तो स्वबळावर मिळविण्याची किमया तिने साधली. धर्मशास्त्रीय नियमांना स्त्रीव्दारे मिळालेली ही मोठी चपराक होती. राजकीय हक्काबरोबरच स्त्री दास्याच्या संरचना नाकारण्याची प्रवृत्ती स्त्री वर्गात विकसीत झाली होती. हे 1918 च्या शिक्षणविषयक पटेल बिल, 1928–29 च्या शारदा विधेयक, 1937 च्या वारसा हक्क विधेयकांसाठी राष्ट्रीय पातळीवर स्त्री वर्गाने उभारलेल्या लढयातून दिसून येते. थोडक्यात "स्त्री जाणीवांचा मुक्त अविष्कार 20 व्या शतकात होऊ लागला. समाजातील स्वतःचे स्थान निश्चित करण्याची दृष्टी या काळात विकसीत झाली. पितृसत्ताक परंपरांना नाकारण्याचे त्यांना आव्हान देण्याचे सामर्थ्य स्त्री वर्गात आले. स्वतःच्या हक्काबद्दलची जाण आणि जागृती स्त्री वर्गात येऊ लागली. अर्थात या कालखंडात स्त्री विषयक सुधारणा चळवळीचे धुरिणत्व करणारा स्त्री वर्ग हा उच्च वर्गातून आला होता. शिक्षीत होता. ग्रामीण स्त्री प्रश्नांबाबत हया वर्गाकडे पुरेशी जाण नव्हती तरीही स्त्री म्हणून प्रत्येक स्त्रीच्या स्त्रीदास्याच्या शोषणाच्या संरचनांना आव्हान देण्यासंबंधाने हया चळवळीने कार्य केले. हया चळवळीला मुख्य भर स्त्रीला समाजाच्या सार्वजनिक प्रवाहात आणण्यावर राहिला. ही या चळवळीची काही अंशी मर्यादा होती".

19 व्या शतकाच्या अंतिम दशकात जोर पकडलेल्या राष्ट्रीय चळवळीने 20 व्या शतकाच्या सुरवातीस संपुर्ण भारतात आपला प्रभाव निर्माण केला. हया चळवळीपासून महाराष्ट्रीय महिलाही अलिप्त नव्हत्या. 1906 मध्ये लो. टिळकांना राजद्रोहाच्या आरोपाखाली शिक्षा झाली तेव्हा मुंबईतील  महीलांनी लक्ष्मीबाई टिळकांना सांत्वनापर पत्र लिहून टिळकांच्या कार्याचा गौरव केला. राष्ट्रीय चळवळीप्रती आलेल्या आत्मभानाची ही नांदी होती. गांधी युगात तर महाराष्ट्रीय स्त्री मोठया जोशात राष्ट्रीय चळवळीत सहभागी झाली. पुरूषांच्या खांदयाला खांदा देऊन लढली. वस्तुतः स्त्री वर्गात राष्ट्रीय

आंदोलनाची असलेली निष्ठा ही स्त्री जाणीवांचा झालेला उदय, गांधीच्या आवाहनास स्त्री वर्गाने दिलेला प्रतिसाद आणि राष्ट्रीय कर्तव्याप्रती त्यांच्या मनात निर्माण झालेल्या आत्मनिष्ठांचा परिणाम होता. राष्ट्रीय राजकारणात सहभागी होण्याच्या प्रक्रीयेच्या हा शुभारंभ होता. स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारताच्या राजकारणात, समाजकारणात, महीला वर्गाने स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले. त्याची पृष्ठभुमी राष्ट्रीय चळवळीत तयार झाली होती.

एकंदरित 19 व्या व 20 व्या शतकात घडून आलेल्या सामाजिक, धार्मिक सुधारणा चळवळीमुळे स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील स्त्री वर्गावर निश्चित प्रभाव पडला. या प्रभावाचे वर्णन नलिनी पंडीत यांनी श्वर्गीय प्रभावश असे केले आहे. हा वर्गीय प्रभाव मुख्यत्वे नागरी व ग्रामीण महाराष्ट्रीय स्त्री जीवनाशी निगडीत राहीला. समाजसुधारणा, धर्मसुधारणा व राष्ट्रीय चळवळ यांच्याशी अधिक निगडीत राहील्याने नागरी क्षेत्रातील स्त्री अधिम सजग, बुध्दीवादी व जागृत बनली. तर्कवादाच्या जवळ गेली. त्यातुलनेत महाराष्ट्रातील ग्रामीण स्त्री 21 व्या शतकाच्या उंबरठयावरही धर्मप्रभावातून मुक्त झालेली नाही हे डॉ. मिनल जगताप यांनी आपल्या संशोधनातून पुढे आणले. याची कारणमिमांसा करू पाहता प्रकर्षाने जाणवते ते हे की, सुधारणांचा विचार आणि कृती कार्यक्रम मुख्यत्वे उच्च वर्गाशी आणि त्यातही नागरी समाजाशी निगडीत राहील्याने ग्रामीण स्त्री हया परिवर्तनापासून वंचित राहीली. तिला हया प्रवाहात आणण्यासाठी धर्मविचारांची पुन्हा एकदा फेर मांडणी करणे आवश्यक ठरले आहे.

## 12. **Achievements from the Project:-**

स्त्री दास्याची हजारो वर्षाची परंपरा हिंदू धर्म शास्त्रातंर्गत असलेल्या पितृसत्ताक समाजरचनेत सुरू आहे. हया संरचनेला प्रबोधन कालखंडात तडा देण्याची प्रक्रीया प्रारंभ झाली ती आजगत चालू आहे. धर्मसुधारणा, समाजसुधारणा, स्त्रियांचा सार्वजनिक जीवनातील प्रवेश व अधिकारांसाठीचा लढा, स्त्रीवादी चळवळ असे हया लढयाचे स्वरूप राहीले आहे. हया संशोधनातून हया सर्वच बाबींचा ऐतिहासीक दृष्टीने आढावा घेण्यात आला आहे. स्त्री दास्याच्या विविधांगाचे शोषणाच्या संरचनातून मुक्त होण्याचे बहूतेक लढे धर्मशास्त्रांविरोधात उभे राहीले. त्यामुळे आज महाराष्ट्रीय स्त्री जीवनाच्या विविध समस्यांची सोडवणूक करण्यासंबंधाने हया प्रंबधाचे लेखन करण्यात आले आहे. सुधारकांनी स्विकारलेली धर्मविषयक विवेकदृष्टी आजच्या स्त्रीसाठी निश्चितच मार्गदर्शक ठरेल हा मुख्य विचार हया विषयांच्या संशोधनाच्या केंद्रस्थानी राहीला. आणि त्या अनुषंगाने मांडणी करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

हिंदू समाजजीवन धर्मशास्त्रांकित असल्यामुळे सुधारणांचा विज्ञाननिष्ठ विवेकवादी विचार हिंदू समाजात रूजणार नाही हे जाणून सुधारकांनी धर्मशास्त्रीय प्रमाणांवर सर्वाधीक भर दिला. प्रकरण 3 मध्ये त्या प्रमाणासंबंधाने चर्चा करण्यात आली. हे प्रमाण देतांनाचे त्याचा आधुनिक अन्वयार्थ लावण्यावरही सुधारकांचा भर राहीला. समाज सुधारणा विचार समाज जीवनात रूजण्याचे हे प्रभावी कारण ठरले. लोकमतास अनुकूल आधुनिक विचारांच्या प्रतिपादनामुळे स्त्री शिक्षणाची चळवळ महाराष्ट्रात रूजू लागली. स्त्री जीवनाशी निगडीत असणा—या रूढी परंपराकडे बघण्याचा समाजाचा अंशतः का होईना पण

दृष्टीकोन बदलू लागला. स्त्री सुधारणा संबंधाने कायदयाची निर्मिती करतांना धर्मशास्त्रीय प्रमाणांनी महत्वाची भुमिका बजावली. ही सनातन्यांना त्यांच्या विचारांना दिलेली मोठी चपराक होती. ज्याचे परिणाम 20 व्या शतकात जाणवू लागले.

20 व्या शतकाच्या सुरवातीपासुनच स्त्री वर्ग स्वतःच्या सुधारणासंबंधाने अधिक जागृत होऊ लागला. सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय अधिकारांची भाषा स्त्री वर्गातून केली जाऊ लागली, धर्म रूढींचे नव्या अर्थाने स्विकार करण्याची परंपरा स्त्री वर्गाने प्रथमतः सुरू केली. आर्थिक स्वावलंबनासंबधाने सहकारी तत्वांचा स्विकार करून संघटित स्त्री जाणीवांचा साक्षात्कार घडवून आणला. शिक्षणाच्या क्षेत्रात भरारी घेत उच्च शिक्षणातही स्त्रीने स्थान मिळविले. त्या आधारावर नोकरी करण्याची उमेद स्त्रीमध्ये निर्माण झाली. राजकीय हक्कांची भाषा करित मतदान अधिकार, स्थानिक स्वराज्य संस्था सारख्या क्षेत्रात सहभाग घेण्याच्या प्रक्रीयेची स्त्री वर्गात जाणीव निर्माण होऊ लागली. आणि सर्वांत महत्वाचे राष्ट्रीय चळवळीत स्त्री वर्गाने उत्साहाने सहभाग नोंदविला. स्त्री ही ‘‘शोषित वस्तु’’ नसून ‘‘कर्तव्यांच्या क्षेत्रात’’ ती पुरूषांच्या बरोबरीने कार्य करू शकते हे दाखवून दिले.

स्त्री वर्गाच्या हया संघटित प्रवृत्तीच्या प्रभाव स्वातंत्र्योत्तर कालखंडात अधिक विकासशील बनला. स्त्री जीवनाचे नवे पर्व सुरू झाले ज्यात स्त्री पुरूषांच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रात सहभागी होऊ लागली.

धर्मसुधारणा चळवळीचे सर्वांत मोठे अपयश म्हणजे ही चळवळ ग्रामीण स्त्री वर्गापर्यंत त्यातही बहूजन स्त्री वर्गापर्यंत जोमाने पोहचू शकली नाही. त्यामुळे नागरी क्षेत्रातील स्त्री आपल्या हक्काबाबत जितकी सजग बनली तितकी ग्रामीण स्त्री 21 व्या शतकाच्या उंबरठयावर असतांनाही सजग बनू शकली नाही. कायदेशीर अधिकारांची प्राप्ती करूनही हा वर्ग शैक्षणिक, धार्मिक व सामाजिक जीवनात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण करू शकला नाही. पितृसत्ताक संरचनांना तोडू शकला नाही.

## 13. **Summary of the Findings (In 500 words)**

19 व्या, 20 व्या शतकातील सुणारणा चळवळीचा अभ्यास करतांना तत्कालीन समाजजीवनाचे स्वरूप, धर्म कल्पनांचा प्रभाव, लोकव्यवहारनिती बाबींना ध्यानात घ्यावे लागते. हिंदू धर्माची जडणघडण व त्याचे समाज जीवनातील स्थाने हे अपरीवर्तनीय स्वरूपाचे राहीले. त्याचा समाज सुधारणांच्या क्षेत्रात सुधारकांनी यथायोग्य वापर करतांना समाजमन दुखावणार नाही. सुधारणांचा पुरस्कार करतांना त्याची सामाजिक संघर्षात परिणती होणार नाही, तसेच पाश्चात्य विचारधारेला प्रत्युत्तर देणारी शैली स्विकारावी लागणार होती, हयाची सुधारकांनी जी काळजी घेतली त्यात दडलेले आहे. त्यामुळे महाराष्ट्रात सुधारणेचा विचार व्यापक प्रमाणात रूजू लागला. धर्मशास्त्रीय व्यवस्थांची चौकट नाकारतांना, हिंदू धर्मात लपलेले आदर्श जीवनाचे सुत्र सुधारकांनी अलगदपणे स्विकारले. लोकांमध्ये बौध्दिक भावनांची पेरणी केली. त्याचेच विस्तृत परिणाम पुढील काळात महाराष्ट्राला दिसून आले. त्याची मांडणी पुढीलप्रमाणे

19 व्या शतकातील सुधारकांनी सामाजिक सुधारणांच्या अनुषंगाने धर्मशास्त्रांचा अभ्यास करून त्या आधारावर हिंदू धर्मात प्रचलित असलेल्या रूढी परंपरावर टिका केली. स्त्रीवर लावण्यात आलेल्या धर्मशास्त्र व कायदेशीर अपात्रतांमध्ये असलेल्या अवगुणांवर टिका केली. हिंदू समाजाच्या अवनतीमागे स्त्री दास्याला मुख्य कारण मानून हिंदू समाजाची प्रगती ही स्त्रीविषयक सुधारणांमध्ये दडलेली असल्याचे वारंवार दाखवून दिले.

पाश्चात्य संस्कृती व विज्ञाननिष्ठ समाज हे सुधारकांसमोर आदर्श होते. युरोपीय समाजाची प्रगती ही त्या समाजात स्त्रीला असलेल्या मानाच्या स्थानामुळे, सहभागामुळे झाल्याचे दृश्य सुधारकांसमोर होते. हया दृश्याची भारतीय रूपे सुधारकांच्या मनात तयार होऊ लागली. त्या आधारावर सुधारकांनी स्त्री जीवनाच्या आदर्शीकरणाचे आधुनिक प्रतिमान तयार करण्यावर आपले लक्ष केंद्रित केले त्यासाठी परंपरागत मुल्यांना नाकारून आधुनिक मुल्यांच्या आधारावर स्त्री जीवनाची पुनर्मांडणी करण्यावर त्यांनी भर दिला.

## 14. Contribution to the Society (Give Details):-

आजही शिक्षणाच्या क्षेत्रात, राजकीय, सामाजिक, आर्थिक व्यवस्थांमध्ये स्त्री वर्गाचा हवा तितका सहभाग दिसून येत नाही. यापाठीमागच्या कारणांचा शोध घेतला असता. एकतरं तिला पुरूषी वर्चस्वातून मुक्त होण्याच्या आणि फुले प्रणित समतावादी सहजीवनाच्या कल्पनेत समाविष्ट करण्यात आले नाही. दुसरे, महाराष्ट्रीय ग्रामीण स्त्री अजूनही ज्ञानाच्या क्षेत्रात प्रगती करू शकली नाही. कायदयाच्या 18 वर्षाच्या अटीची पुर्तता होताच तिचा संसार फुलु लागतो. परिणामी, आधुनिक जगाची ओळख होण्याच्या वयात ही स्त्री सांसारिक स्त्री म्हणून परिचीत होते. तिचे अस्तीत्व सार्वजनिक व राहता कौटुंबिक राहते. ही वस्तुस्थिती आहे. त्या अनुषंगाने हया संशोधनाचा स्त्री उन्नतीच्या दिशेने मदत होईल हा हेतू राहीला आहे.

15. **WHETHER ANY PH.D. ENROLLED/PRODUCED**:- NIL

16. **NO. OF PUBLICATIONS OUT OF THE PROJECT**:- NIL
(PLEASE ATTACH RE-PRINTS)

AMBADAS ONKAR BAKRE
**(PRINCIPAL INVESTIGATOR)**

SHRI Y.M.NASRE
**PRINCIPAL**,
N.M.D. COLLEGE, GONDIA

Principal
Natwarlal Manikial Dalal
College of Arts & Commerce
GONDIA Dist. Gondia (M.S.

http://nmdcgondia.org/mrpfile/Ambadas_Bakre.pdf